जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 DEC 2023
पुढारी

# गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवार (दि. १) रोजी सकाळी ११ वाजता गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. 'आत्मनिर्भर भारत व युवकांचे योगदान' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती असेल.

-1 DEC 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फ्लॉरेन्सच्या धर्तीवर छत्रपती राजाराम महाराजांचे स्मारक व्हावे

## पुण्यस्मरणदिनी आजी - माजी राजारामियन्सची भावना : चरित्रही प्रकाशित करण्याची मागणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

दीडशे वर्षांपूर्वी सर्वांना इंग्रजीचे शिक्षण मिळण्याचे स्वप्न पाहणाऱ्या, शैक्षणिक क्रांती घडविणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज यांना त्यांच्या १५३ व्या पुण्यतिथीदिनी गुरूवारी अभिवादन करण्यात आले. राजाराम महाविद्यालयात झालेल्या या स्मरण कार्यक्रमात छत्रपती राजाराम महाराजांचे जीवन, कार्य समजावे, यासाठी त्यांचे इटलीतील फ्लॉरेन्स येथील स्मारकाप्रमाणे स्मारक व्हावे, अशी भावना आजी माजी राजारामियन्सनी व्यक्त केली. राजाराम महाराजांवरील चरित्र प्रकाशित करण्याची मागणीही यावेळी झाली. त्याची जबाबदारी बाळ पाटणकर यांनी घेतली.

कोल्हापूर संस्थानच्या इतिहासात अनेक छत्रपती झाले. त्यामध्ये करवीर संस्थापिका महाराणी छत्रपती ताराराणी, राजर्षी शाहू महाराज, त्यांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांचे जीवनकार्य सर्वश्रुत आहे. पण इतर छत्रपतींप्रमाणेच



कोल्हापूर : छत्रपती राजाराम महाराज यांना स्मृतीदिनी गुरूवारी राजाराम महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. व्ही. एन. शिंदे, बाळ पाटणकर, प्राचार्य डॉ. वाय. पी. अत्तार, प्रा. रघुनाथ कडाकणे, प्रा. संजय पाठारे, स्मिता सावंत-मांढरे, शशिकांत पाटील, नकुल पाटणकर, हेमंतबापू पाटील, सिद्धार्थ पाटणकर आदी.

वीस वर्षांचे उणेपुरे आयुष्य लाभलेल्या छत्रपती राजाराम महाराज दुसरे यांच्याविषयी फारशी माहिती नाही. या कार्यक्रमात प्रा. रघुनाथ कडाकणे यांनी राजाराम महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. चार-पाच वर्षांच्या कालखंडात राजाराम महाराज यांनी प्रभाव पाडला. इंग्रजीवर प्रभुत्व असणाऱ्या राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात इंग्रजी शिक्षण सर्वांसाठी सुरू करण्याच्या दृष्टीने सुरूवात केली. त्याकाळी हिंदू धर्मात समुद्र पर्यटन निषिद्ध असताना समुद्र ओलांडून जाणारे ते कोल्हापूर संस्थानचे पहिले छत्रपती होते, ते कसे प्रागतिक विचाराचे होते. त्यांनी इंग्लंडच्या राणी, राजकुमारांची कशी भेट घेतली, त्यांचे निधन झाल्यानंतर इटलीच्या सरकारने राजाराम महाराजांच्या पार्थिवाचे दहन करण्यास कशी परवानगी दिली, फ्लॉरेन्समध्ये अर्नो नदीच्या किनारी उभारलेले स्मारक आदीची माहिती प्रा. कडाकणे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एम. शिंदे यांनी राजाराम महाराजांच्या जीवन कार्यावरील पुस्तकाची निर्मिती करण्याची सूचना केली. प्राचार्या डॉ. वाय. पी. अत्तार यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रा. संजय पाठारे यांनी मानले. कार्यक्रमाला सिद्धार्थ पाटणकर, नकुल पाटणकर, पोलीस निरीक्षक सतीशकुमार गुरव, माजी मानद सचिव शशिकांत पाटील, दीपक जमेनिस, हेमंतबापू पाटील, शशांक पाटील, शाहू काटकर, दिलावर महात, रवी चोपडे, रिमा शेळके-पाटील, स्मिता सावंत-मांढरे, जब्बीन शेख, वारणा वडगावकर आदी उपस्थित होते.

1 DEC 2023 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजारांच्या उपचारासाठी आयुर्वेदिक भस्मांचा वापर

**■ पुण्यातील सी-मेटचे माजी संचालक डॉ. डी. पी. अमळनेरकर यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

आयुर्वेदातील अनेक संशोधन पुढे येत आहेत. आयुर्वेदिक शास्त्रानुसार सोने, चांदी, धातू आणि वनस्पतींचे भस्म तयार केले जाते. या भस्मांचा वापर अनेक आजारावर उपचार म्हणून केला जातो, असे प्रतिपादन पुण्यातील सेंटर फॉर मटेरियल फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (सी-मेट)चे माजी संचालक डॉ. डी पी. अमळनेरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागात राष्ट्रीय परिषेदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील सभागृहात 'नॅशनल कॉन्फरेन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन २०२३' या विषयावर राष्ट्रीय परिषेदेत अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

डॉ. अमळनेरकर म्हणाले, मागील शतकापासूनचे संशोधन व बदललेला प्राधान्यक्रम यात भरपूर फरक आहे. प्रत्येक आजारावर आयुर्वेदातील भस्मांचा वापर केला जात आहे. तसेच यापुर्वी मटेरियल सायन्समध्ये नोबेल प्राईज मिळत नव्हते, ते आता मिळत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त तरुण विद्यार्थ्यांनी मटेरियल सायन्समध्ये संशोधन करावे. कारण संशोधनात अनेक रोजगाराच्या संधी आहेत. त्याचबरोबर मी देश-विदेशात ज्या ज्या ठिकाणी फिरलो तेथे शिवाजी विद्यापीठातील संशोधन विद्यार्थी मला भेटले. सध्या शिवाजी विद्यापीठातील संशोधनाचा जगभर बोलबाला आहे. या विद्यापीठाच्या शेकडो संशोधकांचे जागतिक पातळीवरील संशोधनाच्या क्रमवारीत नाव आहे.

अध्यक्षस्थानावरून प्र-कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, संशोधन व समाज यांचा संबंध जोडताना संशोधकांनी शाश्वत विकासासाठी काम केले पाहिजे. अनेक आव्हाने पेलत संशोधकांनी नवनवीन शोध लावले पाहिजेत. दरम्यान प्रा. मंजना, राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव व डॉ. मुहम्मद मुस्तहफा यांनी पदार्थ विज्ञानातील विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सहभागी संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले. या परिषदेत देशातील व विविध राज्यातील २५० हुन अधिक संशोधकांनी सहभाग नोंदवला आहे.

सचिव डॉ. आर. एस. व्हटकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. के. वाय राजपुरे यांनी मागील चार दशकांपासूनची विभागाच्या प्रगतीचा आढावा घेतला. परिषदेचे संयोजक डॉ. एन. एल तरवाळ यांनी परिषदेच्या आयोजनाची माहिती दिली. डॉ. एस. एस. पाटील. यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2023
सकाळ

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील आठ परीक्षांचे निकाल जाहीर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील आठ परीक्षांचे निकाल आज जाहीर करण्यात आले. आजपर्यंत १०९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कंम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ आर्टस् (भूगोल), मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ आर्टस् इकॉनॉमिक्स (ॲटोनामस), बी. एस्सी-एमएस्सी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बी. एस्सी. एम. एस्सी इकॉनॉमिक्स इंटिग्रेटेड, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाची वर्णनात्मक परीक्षा झाली.

त्यास एकूण ८५९८ पैकी ७१५ विद्यार्थी अनुपस्थित होते. तसेच एम.



ए. मास कम्युनिकेशन सेमिस्टर दोन व तीन, बी. सी. ए. सेमिस्टर तीन, बी. ए. बी. एड. सेमिस्टर तीन, बी. कॉम. सेमिस्टर पाच, बी. कॉम. सेमिस्टर सहा, बी. ए. सेमिस्टर पाच, बी. ए. सेमिस्टर सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. दरम्यान, भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून १७, सातारा जिल्ह्यातून १ अशा एकूण १७ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे झाली. कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठ परीक्षेला ८ हजार ५९८ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षेला गुरुवारी ८ हजार ५९८ हजर होते. मास्टर्स ऑफ आटर्स, सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, आर्टस् (भूगोल), सोशल वर्क, अर्थशास्त्र, बी.एस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स), बॅचलर ऑफ इंजिनिअरिंगच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. दि. ३० रोजी एम.ए. (मास कम्युनिकेशन), बी.सी.ए., बी.ए.बी.एड, बी. कॉम., बी.ए. आदी आठ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजअखेर १०९ अभ्यासक्रमांचे निकाल झाले. सांगली १७, सातारा १ अशा १८ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

- 1 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवी जीवनाच्या जडणघडणीवर पर्यावरणाचा प्रभाव

## डॉ. तुषार चांदवडकर : भोगावती महाविद्यालयात मराठी साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

शाहूनगर, ता. ३० : मानवी जीवनाच्या जडणघडणीवर पर्यावरणाचा मोठा प्रभाव आहे. समाजाचा सर्वांगीण विकास पर्यावरणावर अवलंबून असतो. म्हणूनच पर्यावरण हे मराठी साहित्याचा एक भाग बनले आहे. अनेक साहित्यिकांच्या योगदानातून मराठी साहित्यात पर्यावरणाचे प्रतिबिंब पहावयास मिळते, असे प्रतिपादन डॉ. तुषार चांदवडकर यांनी केले.

कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयात मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे झालेल्या मराठी साहित्यातील पर्यावरणाचे विविधांगी चित्रण या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे होते. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सविता व्हटकर यांनी प्रास्ताविक केले. झाडाला पाणी घालून चर्चासत्राचे उद्घाटन झाले.



कुरुकली : येथील भोगावती महाविद्यालयात झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन झाडाला पाणी घालून झाले. याप्रसंगी डॉ. स्नेहा महांबरे, एन. एल. जमादार, डॉ. तुषार चांदवडकर, जयसिंगराव हुजरे, डॉ. डी. ए. चौगले, बंडोपंत वाडकर, डॉ. सविता व्हटकर उपस्थित होते.

चर्चासत्रात डॉ. सुजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. स्नेहा महांबरे यांचे मराठी साहित्य प्रकारातील पर्यावरणाचे चित्रण या विषयावर, डॉ. सुभाष वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. विनोद गायकवाड यांचे मराठी साहित्य प्रवाहातील पर्यावरणाचे चित्रण या विषयावर, डॉ. भरत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. धनंजय होनमाने यांचे व्याख्यान झाले. डॉ. विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, डॉ. मांतेश हिरेमठ व डॉ. शिला रत्नाकर यांच्या उपस्थितीत निबंध वाचन झाले. भोगावती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचा समारोप झाला. जयसिंगराव हुजरे, प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांची भाषणे झाली. या वेळी संस्थेचे संचालक बंडोपंत वाडकर, पी. बी. कवडे, विलास पाटील, उपप्राचार्या एन. एल. जमादार, प्रा. अनिल पाटील, प्रा. विजय काळेबाग, प्रा. नमिता पाटील, प्रा. गणेश महाडिक, प्रा. रणजित कांबळे, प्रा. किरण पाटील उपस्थित होते. प्रा. वैशाली गुंजेकर व प्रा. पवन पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. एम. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2023
तरुण भारत

# भारतीय राज्यघटनेमुळेच वंचितांचा विकास

## समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय राज्यघटनेतील कलम ४६ द्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी समाज कल्याण विभागाची निर्मिती झाली आहे आणि भारतीय राज्यघटनेमुळेच वंचितांचा विकास झाला आहे, असे मत समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विभाग अंतर्गत प्लेसमेंट सेल व समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त 'भारतीय राज्यघटनेतील कलम ४६ द्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन ' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त साळे यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेतील सर्व घटकांचा अर्थ सांगताना समाज कल्याण विभागाच्या योजनांचा आढावा घेतला. त्यामध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या शिष्यवृत्ती, स्वाधार योजना, तृतीयपंथीयांच्या सामाजिक स्थैर्यासाठीच्या योजना, शैक्षणिक वसतीगृह योजना अशा विविध घटकांच्या संदर्भात मांडणी केली.

प्रास्ताविक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रवीण लोंढे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले यांनी केले. आभार समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी मानले. यावेळी संचालक डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 DEC 2023
पुढारी

# श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या विद्यार्थिनीचे कुस्ती स्पर्धेत यश

**कोतोली : पुढारी वृत्तसेवा**

श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या साक्षी मगदूमने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. तिने कडेपूर येथे झालेल्या महिला कुस्ती स्पर्धेत यश पटकावले.

साक्षी हिला ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, संस्था सचिव शिवाजीराव पाटील, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, प्रा. शीतल चौगुले, प्रा. संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.